**प्रेसनोट**

शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.नं. १४७/१७ कलम ३०४(अ), २७९,३४ भादवि, १३४(अ)(ब), ११९,१७७ मो.वा. कायदा. मधील फिर्यादी नामे शबाना नजीर काझी, वय ३५, धंदा समाजसेवक, रा.१३०/४, शिवदर्शन मुक्तांगण शाळेच्या मागे, पर्वती, पुणे ९ यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०९.०४.२०१७ रोजी सायंकाळी ०६.०३ वाजताच्या सुमारास त्यांचे वडील नामे मोहमद उस्मान गोलंदाज हे त्याचे एम ८० मोटार सायकल क्रमांक एम.एच.१४ जे ६७३० यावरुन शिवाजीनगर पोलीस लाईन जवळ असलेल्या मस्जिदी समोरुन रोडवर वळण घेऊन ज्ञानेश्वर पादूका चौक येथे जात असतांना पाठीमागून येणाऱ्या यमाहा एफ. झेड. मिल्ट्री रंगाच्या पिवळी पटटी असलेल्या मोटार सायकलवरील अज्ञात दोन मुलांनी त्याच्या ताब्यातील मोटार सायकल वेगाने व हयगयीने चालवून मोहमद उस्मान गोलंदाज यांच्या मोटार सायकलला धडक दिल्याने ते रोडवर खाली पडून त्यांचे डोक्यास जबर मार लागून ते जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले आहेत.

<u>यामाहा मोटार सायकलचे व त्यावरील इसमांचे वर्णन खालीलप्रमाणे :-</u>

एक अनोळखी यामाहा एफ.झेड. मिल्ट्री रंगाची पिवळा रंगाचा पटटा असलेली, मोटार सायकल वरील दोन अनोळखी इसम. (सोबत आरोपींचे छायाचित्र जोडले आहे.).

तरी सोबत जोडलेल्या छायाचित्रामधील अज्ञात दोन आरोपी यांचा व त्यांच्या ताब्यात असलेल्या मोटार सायकल बाबत जर कोणाला काही माहीती असल्यास शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर फोन नं. ०२० २५५३६२६३, पोउपनि चव्हाण ९४२११६८२५७ या क्रमांकावर संपर्क साधावा ही विनंती.

आरोपी यांचे छायाचित्र



वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर
सत्यमेव जयते
पुणे शहर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस स्टेशन
पुणे

प्रति,

मा.संपादक सा.

सदर प्रेस नोट आपल्या प्रसिध्द वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

Scanned by CamScanner